# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

MERC

केंद्र क्र. १, १३वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल : mercindia@merc.gov.in संकेतस्थळ : www.merc.gov.in / www.mercindia.org.in


जाहीरात क्र. १/२०१७-१८

प्रकरण क्र. ९४/२०१६

## जाहीर सूचना

**विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८ अंतर्गत मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडचा पारेषण परवान्यात सुधारणा करण्यासाठीच्या अर्जावर अभिप्राय मागविण्याबाबत**

१. मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (आरइन्फ्रा) यांनी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ अंतर्गत त्यांना मंजूर करण्यात आलेल्या पारेषण परवाना क्र. सन २०११ चा १ मध्ये खालील सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे अर्ज दाखल केला आहे. :

अ. 'पारेषणाचे क्षेत्र' ''प्रस्तावित यंत्रणा - ईएचव्ही उप-केंद्राच्या बेज ची यादी'' या शीर्षकाखाली पुढील भर घालणे

- २२० केव्ही वर्सोवा ईएचव्ही उप-केंद्रात २२० केव्ही चे ६ बेज

ब. ''विद्यमान यंत्रणा-पारेषण वाहिन्या'' आणि ''प्रस्तावित यंत्रणा-पारेषण वाहिन्या'' या शीर्षका अंतर्गत दिलेल्या परिच्छेद ३ -'पारेषणाचे क्षेत्र' मध्ये नमूद केल्याप्रमाणे विद्यमान आणि प्रस्तावित पारेषण वाहिन्या आणि बेजच्या यादीमध्ये फेरबदल करणे

२. आरइन्फ्राने अधिनियमाच्या कलम १८(२)(अ) अंतर्गत आवश्यक असल्यानुसार, लेखी सूचना व हरकती मागविण्यासाठी (१) इंडियन एक्सप्रेस (इंग्रजी), (२) हिंदुस्थान टाइम्स (इंग्रजी), (३) लोकसत्ता (मराठी) आणि (४) सामना (मराठी) या वर्तमानपत्रांमध्ये दिनांक २८ फेब्रुवारी, २०१७ रोजी जाहीर सूचना प्रसिध्द केली होती, परंतु त्यावर कोणत्याही सूचना आणि हरकती प्राप्त झालेल्या नाहीत.

३. राज्य पारेषण कंपनीने त्यांच्या दिनांक २१ मार्च, २०१७ रोजीच्या पत्रान्वये आरइन्फ्राने प्रस्तावित केल्याप्रमाणे पारेषण परवान्यात सुधारणा करण्याची शिफारस केली आहे.

४. आयोगाची सकृतदर्शनी खात्री झाली आहे की, सन २००६ मध्ये सुधारणा केलेल्या, मविनिआ (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ अंतर्गत, आरइन्फ्राला मंजूर करण्यात आलेल्या पारेषण परवाना क्र. २०११ चा १ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे सुधारणा करता येईल.

५. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडच्या अर्जाची प्रत, त्यासोबतच्या परिशिष्ट आणि जोडपत्रांसह, आयोगाच्या www.mercindia.org.in/ www.merc.gov.in या संकेत-स्थळांवर किंवा आयोगाच्या कार्यालयात पाहता येईल.

६. प्रस्तावित सुधारणांवर अभिप्राय, सूचना किंवा हरकती इंग्रजी किंवा मराठीत, (६+१) प्रतींमध्ये, ही सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत, आयोगाचे सचिव यांना व्यक्तिशः किंवा पोस्टाने किंवा फॅक्स किंवा ई-मेलद्वारा (फॅक्स:०२२-२२१६३९७६, ई-मेल: mercindia@merc.gov.in) पाठवाव्यात आणि त्यामध्ये पाठविणाऱ्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई-मेलचा पत्ता, असल्यास, उल्लेख करावा. कोणत्याही संस्थेच्या किंवा कोणत्याही ग्राहक वर्गवारीच्या वतीने प्रतिक्रिया दाखल करण्यात येत असल्यास तसे नमूद करण्यात यावे. सूचना/हरकती पाठविणाऱ्या व्यक्तीस सुनावणीच्या वेळी आपले म्हणणे व्यक्तिशः मांडावयाचे असल्यास त्यात स्पष्ट उल्लेख करण्यात यावा म्हणजे अशा व्यक्तीस, **दि. ३० मे, २०१७ रोजी ११.०० वाजता, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५ येथील आयोगाच्या कार्यालयात** होणाऱ्या सुनावणीच्या वेळी, जेव्हा मे. आरइन्फ्राच्या पारेषण परवान्यात सुधारणा करण्याबाबतचा वर उल्लेख केलेला अर्ज विचारात घेण्यात येईल तेव्हा, आपले म्हणणे आयोगापुढे मांडण्याची संधी देण्यात येईल. त्यासाठी वेगळी नोटीस देण्यात येणार नाही.

**दिनांक : २८ एप्रिल, २०१७**
**ठिकाण : मुंबई**

**सचिव**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**